गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक ३२५ वा ● सोमवार १५ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 325 | Date : 15/04/2024 blow Monday Page 4 Price 4


# मोदी की गँरंटी! भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध

## लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदींच्या १० मोठ्या घोषणा

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. मोदी की गँरंटी भाजपचा संकल्प या नावाने भारतीय जनता पक्षाने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जेपी नड्डा यांच्या हस्ते भाजपता जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. भाजप मुख्यालयात हा कार्यक्रम पडला असून यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यावर दिग्गज नेते उपस्थित होते.

भाजपने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचं निमित्त साधत आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या जाहीरनाम्यात रोजगाराच्या संधी, महिला सक्षमकरण आणि शेतकरी यांच्यावर विशेष भर देण्यात आला आहे. भाजपच्या जाहीरनाम्यात उद्योजकतेवरही लक्ष देण्यात आलं आहे.

संपूर्ण देशाला भाजपच्या जाहीरनाम्याची प्रतिक्षा असते. भाजपच्या जाहीरनाम्यात रोजगार आणि उद्योजकतेभर भर देण्यात आला आहे. जनतेला पुढील पाच वर्षांपर्यंत मोफत रेशन मिळेल. पाच लाख रुपयांपर्यंत । **पान २ वर**






## लोकसभा उमेदवार राम सातपुते यांनी केले महामानवाला अभिवादन...

ज्ञानाचा अथांग सागर, भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पार्क चौक येथील पूर्णकृती पुतळ्यास सोलापूर लोकसभेचे भाजप महायुतीचे उमेदवार श्री. रामभाऊ सातपुते व आमदार सुभाष देशमुख,आमदार विजयकुमार देशमुख, उदय पाटील यांच्यासह अनेक मान्यवर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



पुणे येथील वडकी येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने डॉ.आंबेडकर यांचे समाज क्रांतीतील योगदान या विषयावरती आज प्रमुख वक्ता म्हणून मार्गदर्शन केले.यावेळी प्रमुख उपस्थिती प्राध्यापक राहुल रुही ,अनिल सोनकांबळे ,शिवशंकर सोनकांबळे ,व मोठ्या संख्येने प्रारंभ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## निवडणुका असल्या तरी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, मुख्यमंत्र्यांची ग्वाही

बुलढाणा : लोकसभेच्या निवडणुका सुरू असल्या तरी राज्य सरकार आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारासाठी आज मुख्यमंत्री शिंदे येथे आले होते. त्यांनी धाड नाका परिसरातील ओंकार लॉन्स येथे संध्याकाळी सहा वाजता पार पडलेल्या कार्यकर्ता मेळाव्यास संबोधित केले.यानंतर बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी येथे निवडक प्रसिद्धी माध्यमांशी अल्पसंवाद साधला. यावेळी ते म्हणाले, निवडणूका सुरू असल्या तरी मी रोज सकाळी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडून आपत्तीची माहिती घेतो.

कुठे गारपीट, कुठे अवकाळी पाऊस याची माहिती जाणून घेतो. यानंतर या अधिकाऱ्यांना पंचनामे, सर्वेक्षण व मदत करण्याचे निर्देश देतो. त्यामुळे निवडणुका असल्या तरी बळीराजाला वाऱ्यावर सोडणार नाही, त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यावेळी दिली.

## जिल्ह्यात मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्रि अनुज्ञप्त्या बंद

सोलापूर/प्रतिनिधी : भारत निर्वाचन आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी अधिसूचनेद्वारे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार सोलापूर जिल्हयात सोलापूर व माढा असे दोन लोकसभा मतदारसंघ असून जिल्हयातील बार्शी तालुक्याचा भाग धाराशिव लोकसभा मतदारसंघाला जोडण्यात आला आहे. सोलापूर, माढा व धाराशिव लोकसभा मतदार संघांमध्ये दि. ०७ मे २०२४ रोजी मतदान व दि. ०४ जून २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असल्याने सदर कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने मतदानाची वेळ संपण्यापूर्वी ४८ तास अगोदरपासून तसेच मतमोजणीच्या दिवशी जिल्हयातील सर्व देशी विदेशी मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यात दि. ०५ मे २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजलेपासून पुढे (मतदान संपण्याच्या ४८ तास आगोदर), दि. ०६ मे २०२४ रोजी मतदानाच्या पूर्वीचा संपूर्ण दिवस, दि. ०७ मे रोजी मतदानाचा संपुर्ण दिवस व दि. ०४ जून २०२४ रोजी मतमोजणीचा संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद ठेवावी. तसेच । **पान २ वर**

## सर्व शासकीय यंत्रणांनी ७५ टक्के मतदान होण्यासाठी प्रयत्न करावेत : मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम

**✻ निवडणूक निर्भय, निष्पक्ष व शांततेत पार पाडण्यासाठी परस्परात समन्वय ठेवावा ✻लोकसभा सार्वत्रिक निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाची तयारी व्यवस्थित झालेली आहे ✻ जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून पीपीटी द्वारे निवडणुकीच्या तयारीची माहिती बैठकीत सादर**



सोलापूर/प्रतिनिधी : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे या लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ७५ टक्के पेक्षा अधिक करण्यासाठी सुचित करण्यात आलेले आहे. तरी जिल्हास्तरावर सर्व शासकीय यंत्रणांनी निवडणूक कामकाजा बरोबरच मतदारांना मतदार केंद्रापर्यंत आणून त्यांना सर्व अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात व स्वीप द्वारा जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवून सोलापूर जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी ७५ टक्के पेक्षा अधिक होईल यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित लोकसभा निवडणूक आढावा बैठकीत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी । **पान २ वर**

**जिल्हा नियंत्रण कक्ष व मतमोजणी केंद्राला भेट: जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान होणार असून मतदान झाल्यानंतर सर्व ईव्हीएम मशीन ठेवण्यात येणाऱ्या स्ट्राँग रूमची व मतमोजणी केंद्राची पाहणी मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी केली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ई व्हि एम मशीन ठेवणे व सोलापूर, माढा लोकसभा मतदार संघाच्या मतमोजणीच्या अनुषंगानेकेलेल्या तयारीची माहिती दिली.**







## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती गोगांव यांच्या वतीने वही पेन खाऊ वाटप

अक्कलकोट ( प्रतिनीधी ) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती गोगाव यांच्या वतीने अजित गायकवाड यांच्या वतीने वही पेन खाऊ वाटप करण्यात आले

सदर कार्यक्रम अध्यक्षस्थानी सरपंच संघटना तालुकाध्यक्ष प्रदीप जगताप हे होते प्रतिमा पूजन कल्लप्पा बनसोडे व डॉ लिंगराज नडगेरी यांच्या हस्ते करण्यात आले वही व शालेय साहित्य वाटप उपसरपंच कमलाकर सोनकांबळे व शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले खाऊ वाटप पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, आशा सेविका मधुमती गायकवाड, आरोग्यसेविका अंबिका वळसंग यांनी केले यावेळी मुख्याध्यापक दयानंद चोळे, महादेव चव्हाण, प्रमोद सुरवसे, विजयकुमार गायकवाड, शरणबसपा मुळजे, आदी उपस्थित होते

**ग्रामपंचायत गोगांव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी**


ग्रामपंचायत गोगांव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंती साजरी करण्यात आले कार्यक्रम अध्यक्षस्थानी डॉ लिंगराज नडगेरी होते प्रतिमा पूजन नबिलाल नदाफ व बसवराज आलूरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, सुरेश सोनकांबळे, यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

**डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर गोगांव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर गोगांव येथे मोठ्या उत्साहात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती साजरी करण्यात आले कार्यक्रम अध्यक्षस्थानी शरणपा कलशेट्टी हे होते प्रतिमा पूजन कल्लप्पा गायकवाड, विजयकुमार गायकवाड यांनी केले, ध्वजकट्टा पूजन जयंती उत्सव समिती माजी अध्यक्ष शांतकुमार बनसोडे, जयंती उत्सव समिती उपाध्यक्ष लक्ष्मण सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले ध्वारोहण ग्रामपंचायत जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप यांनी केले यावेळी जयंती उत्सव समिती अध्यक्ष चीतानंद सोनकांबळे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, खजिनदार नामदेव बनसोडे, स्वामिनाथ गायकवाड, विनोद बनसोडे, संयोजक नितीन गायकवाड, उपाध्यक्ष श्रीकांत सोनकांबळे, सचिव परमेश्र्वर गायकवाड, आकाश गायकवाड, निगणा तावरखेड, लक्ष्मण गायकवाड, संजय गायकवाड, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, आशा सेविका मधुमती गायकवाड, आरोग्यसेविका अंबिका वळसंग, तयपा गायकवाड, यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

## पश्चिम महाराष्ट्रात भाजपला मोठं खिंडार

### धैर्यशिल यांचा अखेर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश



अकलूज/प्रतिनिधीः भाजपचे धैर्यशील मोहिते पाटील यांनी आज अखेर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत अकलूज येथे त्यांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात मोहिते पाटील यांनी आपली भूमिका मांडली. आपण शरद पवार यांच्यासोबत येण्याचा निर्णय का घेतला? याबाबत त्यांनी स्पष्टीकरण दिलं. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या पक्षप्रवेशावेळी त्यांच्या समर्थकांची मोठी गर्दी उसळलेली बघायला मिळाली. त्यांच्याकडून प्रचंड घोषणाबाजी करून मोहिते पाटील यांचं समर्थन करण्यात आलं. यावेळी मोहिते पाटील यांनी इतिहासातील घडामोडींविषयी । **पान २ वर**

## संपादकीय

### घायाळ करण्याची क्षमता असते.

सर्वच राजकीय पक्ष आणि त्यांचे राष्ट्रीय नेते, प्रादेशिक नेते, स्थानिक नेते, उपनेते सोशल मीडियावर सक्रिय झाले आहेत. जे या व्यवस्थेत सक्रिय नाहीत, त्यांना अलगदपणे बाजूलाही केले जात आहे. आपली बाजू मांडण्यासाठी, मुद्दा पटवून देण्यासाठी, जुन्या गोष्टी उकरून काढण्यासाठी, नवी स्वप्ने दाखवण्यासाठी, आश्वासने देण्यासाठी, न पाळलेली आश्वासने आठवून देण्यासाठी सर्वाधिक वापर कशाचा केला जातो, असा प्रश्न अगदी सहजपणे कोणालाही विचारला तर त्याचे उत्तर सोशल मीडिया असेच येते. फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, यू ट्यूब, व्हॉट्सअॅप या सगळ्याच व्यासपीठांच्या साहाय्याने आपापला अजेंडा पुढे घेऊन जाण्याचे काम चालू आहे. निवडणुकीच्या धामधुमीमुळे सोशल मीडियावर सध्या राजकीय स्वरूपाच्या पोस्टचे प्रमाण वाढले आहे. आम्ही केलेली कामे, त्यांनी न केलेली कामे, आमचे कसे बरोबर, त्यांचे कसे चूक, आजच्या बैठका, उद्याचे प्लॅनिंग असे सगळेच पोस्टच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविले जाते. त्यापैकी काही पोस्टना चांगली एंगेजमेंटही मिळते. म्हणजेच लोक त्या पोस्ट लाइक करतात, त्यावर कमेंट करतात आणि गरज पडली तर आपल्या वॉलवर शेअरही करतात. पण या एंगेजमेंटमध्ये सर्वाधिक मजेशीर काही असेल तर या पोस्टखाली येणाऱ्या कमेंटस्. या कमेंटस् वाचताना एक गोष्ट अनेकांच्या मनात येते. कसे सुचते यांना हे सगळे? एकतर पोस्टच्या तुलनेत अत्यंत कमी शब्दांत कमेंट लिहिलेली असते, पण त्यातून त्या पोस्टमधील विसंगती, खोटारडेपणा ठळकपणे उघड केला जातो. पोस्टमध्ये केलेल्या दाव्यातील फोलपणा एका वाक्यात निकाली काढला जातो. त्यामुळेच या कमेंटस् रंजक होत जातात. मोबाइलमुळे समाजात वाढलेला एकलकोंडेपणा, व्यग्र दिनचर्या यामुळे भेटून एकमेकांशी बोलायला वेळ मिळत नाही. पूर्वी जसे लोक गावात पारावर बसून बोलायचे तसे आता सोशल मीडियावर व्यक्त केलेल्या मतांवर, विविध पोस्टखाली केलेल्या कमेंटस् नेते वाचत असतील. अशी त्यांची भाबडी समजूत नक्कीच नाही, पण समोर जे काही सुरू आहे ते डोळे झाकून आम्ही स्वीकारतो आहोत. तुम्ही जे काही सांगता आहात ते सगळे आम्हाला खरेच वाटत आहे, अशी समजूत राजकीय नेत्यांनी किंवा पक्षांनीही करून घेऊ नये, असेच त्यांना आपल्या कमेंटस्च्या माध्यमातून सांगायचे असते. त्यामुळे या कमेंटस् नीटपणे वाचल्या तर त्या तिरकस असल्याचे ठळकपणे दिसते. त्यात हलक्या-फुलक्या शब्दांत समोरच्या व्यक्तीला घायाळ करण्याची क्षमता असते.

# विधायक बदल घडविण्यासाठी स्वप्ने महत्वाची असतात : प्रा.डॉ.थोरात

## स्वेरीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी

पंढरपूर/प्रतिनिधीः 'अनिष्ठ रूढी, परंपरा, समाजव्यवस्था हे सर्व बदलण्यापूर्वी सर्वप्रथम आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. ज्या विचारांचा पाया महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घातला, त्या विचारांचे आपण अनुकरण करणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आयुष्य आणि कार्य हा एक असा विषय आहे की, ज्याचा पूर्ण अभ्यास केल्याशिवाय आपल्याला त्यांच्या कार्याची महती लक्षात येत नाही. अमेरिका, जपान हे देश आज प्रगतीच्या बाबतीत पुढे आहेत याचे कारण म्हणजे तेथील शिक्षण व्यवस्था भक्कम आहे. भारतीय समाजव्यवस्थेत विषमता असल्याने मुठभर परकीयांनी देशावर वर्चस्व गाजवले. यातून भारताची अधोगती झाल्याचे दिसून येते. म्हणून जर देशासाठी काहीतरी करायचे असेल तर सर्व प्रथम मनातून ज्ञानाची व राष्ट्रभक्तीची ज्योत पेटवावी लागते. त्यामुळे विधायक बदल घडविण्यासाठी स्वप्ने महत्वाची असतात.' असे प्रतिपादन मुंबईमधील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथील प्रा. डॉ.भास्कर थोरात यांनी केले.

स्वेरीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून आय.सी.टी., मुंबई येथील प्रा. डॉ.भास्कर थोरात हे मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. स्वेरी गीत व भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनानंतर स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून 'माणसाकडे प्रचंड इच्छाशक्ती असेल आणि सोबत कष्ट करण्याची तयारी असेल तर तो चमत्कार घडवू शकतो. डॉ.आंबेडकर यांनी विद्यार्थीदशेपासून ते पीएच.डी. शिक्षणापर्यंत व त्यानंतर देखील समाजाच्या प्रगतीसाठी प्रचंड अवघड असे कार्य केले. या मार्गावर त्यांनी अनेक हाल-अपेष्टा, वेदना सहन केल्या. 'माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळाली पाहिजे' या थोर विचारांच्या भक्कम पायावर पुढे डॉ. आंबेडकरांनी समाजाची परिस्थिती बदलण्यासाठी



कार्य केले. 'शिका, संघर्ष करा आणि संघटीत व्हा' हे ब्रीद घेऊन त्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. एकूणच तत्कालीन समाजाची मानसिकता बदलण्याचे कार्य डॉ. आंबेडकर यांनी केले.' असे सांगून त्यांचे कार्य व कर्तुत्वावर प्रकाश टाकला. पुढे बोलताना प्र.पाहुणे डॉ.थोरात म्हणाले की, 'स्वेरीचा पाया उच्च विचारांवर उभा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पूर्णपणे शिक्षित करून त्यांचे जीवन फुलविण्याचे कार्य डॉ. रोंगे सर करत आहेत, हे दिसून येते. म्हणून सध्या भारताला डॉ.रोंगे सरांसारख्या शिक्षकांची गरज आहे. ज्या युवकांकडे स्वप्ने नाहीत त्यांचे जीवन व्यर्थ आहे. राष्ट्रहितासाठी सर्वांनी आपली मानसिकता बदलली पाहिजे कारण प्रत्येक माणसात एक राजहंस दडलेला असतो पण ते आपल्यालाच ओळखावे लागते. शिक्षकांपेक्षा विद्यार्थी हुशार असला तर त्याचा शिक्षकाला अभिमान वाटला पाहिजे. प्रगती करायची असेल तर प्रथम माणसातील शिक्षकांना शोधा, त्यांना अभ्यासाच्या पुर्ततेसाठी प्रश्र्नांचा भडीमार करून त्रास द्या, त्रास देऊनही जे शिक्षक तग धरून राहतील तेच खरे विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे नंदनवन करतील. डॉ.आंबेडकरांनी त्यांचे शिक्षक शोधले. त्यामुळे ते विद्वान झाले. डॉ.आंबेडकरांच्या विचारांची पद्धत ही समाजाच्या समजण्याच्या पलीकडे होती. जोपर्यंत समाजातील मानसिकता बदलत नाही तोपर्यंत विकास होऊ शकत नाही. म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर नको, डोक्यात घ्या.' असे सांगून भाक्रा-नांगल प्रकल्प, नदी जोड कालवा, जलप्रकल्प यावर त्यांनी सविस्तर सांगितले. अध्यक्षीय भाषणात स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'भारतरत्न डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले आहे. यावर डॉ.थोरात सरांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनाकडे कसे पहावे? हे उत्तम पद्धतीने सांगितले.' असे सांगून त्यांनी १३ व्या शतकातील संत नामदेव, संत ज्ञानेश्र्वर व संत जनाबाई यांच्या कार्यावर प्रकाश टाकून पंढरपूर व डॉ. आंबेडकर यांचे 'मूकनायक' वृत्तपत्र याबाबत सविस्तर माहिती सांगितली. यानंतर पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या गुणवत्ता यादीत स्वेरीच्या अभियांत्रिकी व फार्मसीमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक, प्रोजेक्ट आणि विभागात यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच पीएच.डी. प्राप्त केलेल्या प्राध्यापकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. 'स्वेरीयन' च्या त्रैमासिक अंकाचे प्रकाशन देखील यावेळी करण्यात आले. यावेळी सौ.पद्मा थोरात, भानुदास वाघमारे, सौ. जमुना वाघमारे, पालक, स्वेरीचे विश्र्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे, विद्यार्थिनी प्रतिनिधी पूजा बत्तुल, यांच्यासह स्वेरी संचलित अभियांत्रिकी व फार्मसीचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व चारही महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रम विभागाचे प्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

पान १ वरुन

### सर्व शासकीय यंत्रणांनी ७५ टक्के ..

मोनिका सिंह ठाकूर, पोलीस शहर उप आयुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर तसेच विविध समित्यांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोकलिंगम पुढे म्हणाले की, आपले राज्य सर्व क्षेत्रात देश पातळीवर अग्रेसर आहे. परंतु मतदानाच्या टक्केवारीत इतर राज्याच्या तुलनेत व राष्ट्रीय सरासरीपेक्षा मतदानाची टक्केवारी कमी आहे. तरी सर्व यंत्रणांनी परस्परात चांगला समन्वय ठेवून मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी प्रयत्न करावेत. मागील लोकसभा निवडणुकीत ज्या ठिकाणी मतदानाची टक्केवारी कमी आहे अशा ठिकाणी मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. मतदानाची टक्केवारी जास्त होणाऱ्या मतदान केंद्रासाठी स्पर्धा ठेवावी. मतदान केंद्रावर मतदारासाठी वेटिंग रूम करून टोकन सिस्टीम प्रमाणे मतदानासाठी बोलवावे मतदानाच्या जवळ वाहन पार्किंगची व्यवस्था करावी असेही त्यांनी सूचित केले.

जीएसटी, उत्पादन शुल्क व वन विभागाने त्यांच्या स्तरावरून चेक पोस्ट तयार करून वाहनांची कसून चौकशी करावी. एस एस टी व एफ एस टी टीमने प्रत्येक वाहनांची व्यवस्थित तपासणी करून कॅश व अवैध दारू वाहतूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. सर्व चेक पोस्टवर मोठ्या प्रमाणावर तपासणी मोहीम राबवावी. सिव्हिजनवरील तक्रारींचा निपटार वेळेत करावा.

सर्व मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. खर्च समितीने उमेदवाराचा खर्चावर व्यवस्थित नियंत्रण ठेवून प्रत्येक खर्चाची नोंद घ्यावी. ईव्हीएम वर व्यवस्थित नियंत्रण राहील याची दक्षता घ्यावी. हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने ईव्हीएम मशीन संबंधी सर्व प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या निर्देशा प्रमाणे पार पाडावी, अशा सूचना श्री. चोकलिंगम यांनी दिल्या.

मतदार यादीत जिल्ह्यातील कोणत्याही महत्त्वाच्या व्यक्तीचे नाव समावेश करण्याचे राहून जाणार नाही याची दक्षता घ्यावी. क्यू लेस वोटिंग प्रक्रिया राबवावी सर्व सूक्ष्म निरीक्षकांचे प्रशिक्षण व्यवस्थितपणे घ्यावे. ईपिक कार्ड चे वितरण व्यवस्थित करावे. भारत निवडणूक आयोगाच्या परवानगीने डमी बॅलेट युनिट वापरण्याचा अधिकार उमेदवारांना आहे त्याबाबत राजकीय पक्ष व माध्यमाना माहिती द्यावी. पोलीस विभागाने शहरी व ग्रामीण भागातील सर्व मतदान केंद्रावर तसेच जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील या दृष्टीने आवश्यक तो बंदोबस्त उपलब्ध करून त्याचे सूक्ष्म आराखडा करावा. सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक प्रशासनाची तयारी व्यवस्थित झालेली असून याच पद्धतीने पुढेही काम करून निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडावी असे आवाहन श्री. चोकलिंगम यांनी केले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघाच्या अनुषंगाने प्रशासनाच्या झालेल्या तयारीची माहिती पीपीटी द्वारा बैठकीत सादर केली. निवडणूक आयोगाच्या सूचनाप्रमाणे जिल्ह्यात निवडणूक विभागाचे विविध प्रशासकीय यंत्रणा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकाऱ्यांच्या माध्यमातून

कामकाज सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार यांनी सोलापूर शहरातील मतदान केंद्र यासाठी देण्यात आलेल्या पोलीस बंदोबस्ताची तसेच शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तर पोलीस अधीक्षक सरदेशपांडे यांनी ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर पोलीस विभागाकडून देण्यात आलेल्या बंदोबस्ताची माहिती देऊन निवडणूक प्रक्रिया शांततेत होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याचे सांगितले.

तसेच नियोजन भवन येथील निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा नियंत्रण कक्षाला ही श्री. चोकलिंगम यांनी भेट देऊन येथील कामकाजाची पाहणी केली. यावेळी कक्षाचे नोडल अधिकारी आशिष लोकरे यांनी जिल्हा नियंत्रण कक्षा कडून निवडणूक विषयक करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती देण्यात आली.

### पश्चिम महाराष्ट्रात भाजपला

भाष्य केलं. तसेच भाजपकडून उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर काय-काय घडामोडी घडल्या, याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

मी दिवाळी पाडव्याला इच्छा व्यक्त केली की, खासदारकीसाठी मी इच्छुक आहे म्हणून. मी सगळ्या मतदारसंघात फिरत राहिलो. भाजपची १३ मार्चला उमेदवारी जाहीर झाली. मी म्हटलं आता घरी बसू. पुढच्यावेळेस संधी मिळेल तेव्हा बघू. पण माळशिरस तालुक्याची जनता तसेच माढा लोकसभेच्या कार्यकर्त्यांनी प्रत्येकाने मोठ्या दादांना आणि बाळादादांना भेटायला सुरु केलं. भैय्याला आमच्या गावात पाठवून द्या. भेटायचं आहे. मग बाळादादांनी सांगितलं की, प्रत्येक गावात जा आणि लोकं काय म्हणतात ते ऐकून घ्या. मी प्रत्येक गावात गेलो. आमच्या आजोबापांसून रणजित दादा यांनी आपापली पदे असताना काय-काय दिलं याची उजळणी गावकरी करुन देत होते. पण सर्वांनी आठवण करुन दिली. एका गावात मला तरुण पोरांनी सांगितलं, उभं राहणार असाल तर या, नाहीतर गाडीत बसा आणि जा. जाईल तिथे असाच पट्टा सुरु झाला, असा अनुभव धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितला.

मी हे सर्व कुटुंबियांना सांगत होतो. त्यानंतर वेदना सांगायला सुरुवात केली. बऱ्याच जणांनी दुधाचे दर, शेतकऱ्यांची अवस्था, पाण्याचे प्रश्र्न सांगायला सुरुवात केली. एढ्या व्यथा ऐकल्यानंतर मी एका दिवशी ठरवलं की आता माझ्यासाठी मला उभं राहायचं नाही. कारभारी चांगला असावा लागतो. या सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांना चांगला कारभारी पाहिजे. चांगला कारभार करण्याची शिकवण आम्हाला सहकार महर्षी आणि मोठ्या दादांनी दिला आहे. आता तुम्हीच सांगा आम्ही काय निर्णय घ्यायचा?, असा सवाल मोहिते पाटलांनी आपल्या कार्यकर्त्यांना केला. काही जणांनी प्रश्र्न विचारला, मागच्या वेळेस शरद पवारांना सोडून गेले. त्याचं उत्तर मी द्यायची गरज नाही. ६०-६५ वर्षात शरद पवार आणि दादांनी एकमेकांची दोस्ती आणि ऋणानुबंध जपले आहेत. मी सांगण्यापेक्षा मेहबूब भाई शेख यांनी त्यामागचं कारण सांगितलं आहे. आता फार कोणी त्याबद्दल प्रश्र्न विचारु नका. आपण १६ तारखेला पुन्हा भेटणार आहोत, असं धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले.

### मोदी की गॅरेंटी! भाजपचा

मोफत उपचार घेता येतील. जन औषधी योजनेचा विस्तार केला जाईल, असंही पंतप्रधान मोदी यांनी संबोधन करताना सांगितलं आहे. **लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदींच्या १० मोठ्या घोषणा*** रोजगार आणि उद्योजकतेभर भर * मोफत रेशन योजना पुढील पाच वर्ष सुरु राहणार * आयुषमान भारत योजनेअंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंत विमा आणि मोफत उपचार, ७० वर्षांवरील वृद्धांना आयुषमान भारत योजनेचा लाभ मिळणार, तृतीयपंथीयांना आयुषमान भारत योजनेचा लाभ मिळणार * गरीबांसाठी तीन कोटी घरे बांधणार * पाईपमार्फत स्वस्त गॅस घराघरात पोहोचवणार * वीजबिलाचा शून्य करण्यासाठी काम करणार, कोट्यवधी कुटुंबांचे वीज बिल शून्यावर आणण्यासाठी आणि विजेपासून कमाईच्या संधी निर्माण करण्यासाठी आम्ही काम करू. पीएम सूर्य घर मोफत वीज योजना लागू करणार * गरीबांसाठी अनेक योजनांचा विस्तार * कृषी क्षेत्रावर विशेष लक्ष, देशात फूड प्रोसेसिंग हब बनणार, नॅनो युरियाच्या वापरावर भर देणार * महिलांसक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार, सर्व्हायकल कॅन्सरच्या उपचारावर भर, ३ कोटी महिलांना लखपती दिदी करणार, महिला बचत गटांना माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य आणि पर्यटन या क्षेत्रात प्रशिक्षण देणार * मुद्रा योजना १० लाखांवरून २० लाखांवर, मुद्रा योजनेंतर्गत यापूर्वी १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज दिले जात होते. आता ही मर्यादा वाढवून २० लाख करण्याचा निर्णय भाजपने घेतला आहे. मला विश्र्वास आहे की इंडस्ट्री ४.० च्या युगासाठी आवश्यक असलेली इकोसिस्टम तयार करण्यासाठी एक नवीन शक्ती म्हणून याचा वापर केला जाईल.

### जिल्ह्यात मतदान आणि..

सोलापूर जिल्ह्याच्या लगत असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर लोकसभा मतदारसंघांचा मतदानाचा दिवस दिनांक १३ मे २०२४ रोजी असल्याने मतदारसंघाच्या सीमेलगत सोलापूर जिल्ह्यातील ५ किलोमीटर अंतराच्या आतील सर्व किरकोळ व घाऊक अनुज्ञप्या मतदान समाप्तीकरिता निर्धारित केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासून म्हणजेच दिनांक ११ मे २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपासून दिनांक १३ मे २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत किंवा प्रत्यक्षात मतदान संपेपर्यंत तसेच मतमोजणीच्या दिवशी संपूर्ण दिवस बंद ठेवण्यात यावीत.

महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ च्या नियम २६ (१) (सी) (१), मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३, विशेष परवाने व अनुज्ञप्ती नियम, १९५२ चा नियम ५ (१०) (इ) (ल) (१) तसेच महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री व विक्रीच्या नोंदवहया इत्यादी), नियम १९६९ च्या नियम ९ ए (सी) (१), महाराष्ट्र ताडी दुकाने (अनुज्ञप्ती) आणि ताडी झाडे (छेदणे) नियम, १९६८ मधील तरतूदी नुसार जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी आदेश निर्गमित केले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सर्व मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी निवडणूक क्षेत्रातील अबकारी अनुज्ञप्त्या मद्य विक्रीकरीता पूर्णपणे बंद ठेवाव्यात. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित अनुज्ञप्तीधारकाविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ व त्याअंतर्गत असलेल्या नियमातील तरतूदीनुसार तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील तरतूदीनुसार कडक कारवाई करण्यात येईल व संबंधित अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहेत.



विश्र्वरत्न भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आधारस्तभ रॉयल नगरसेवक श्री मिलन दादा कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष श्री यशवंत तात्या धोंगडे मा नगरसेवक श्री महेश मालक हिंडोळे, मार्गदर्शक डॉ. गणेश थिटे आधारस्तभ श्री इरू अण्णा गवंडी ता अध्यक्ष मोतीराम राठोड शहर अध्यक्ष जोजन नगरसेवक श्री कांतू धनशेट्टी, उद्योजक राहुल मालक उत्तरकर व सर्व सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थित प्रतिमा पुजन करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पहिल्याच पावसात शहरातील रस्ते ठरले कमिशनखोरीचे बळी







मंगरूळपीर : निकृष्ट दर्जाच्या कामाच्या बाबतीत अधिकांश तक्रारीसाठी हे शहर प्रसिद्ध आहे. कमिशन खोरीचा सुळसुळाट झालेला असल्यामुळे अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी कामावर फिरकूनही पाहत नाही. ठेकेदारांची साम्राज्य असलेल्या बांधकाम यंत्रणेवर कुणाचाही वचक असल्याचे दिसून येत नाही. या शहरात बांधकाम झालेले अनेक रस्ते पहिल्याच पावसात कमिशनखोरीचा बळी पडले. अनेक रस्त्यांचा तर वरचा थरच वाहून गेला मात्र अशा परिस्थिती त्यावर ठेकेदारांकडून डागडूजी करून घेण्याची हिंमत प्रशासनाला झाली नाही. अनेक वर्ष खराब अवस्थेत नागरिकांनी या रस्त्यांवरून प्रवास केला. नागरिकांच्या त्रासाबद्दल कुठलीही संवेदना नसलेल्या लोकप्रतिनिधींनी यावर कधीही आवाज उचलला नाही कुठलेही आंदोलने विरोधी गटाकडूनही झालेले दिसत नाही. मंगरूळपीर शहरातील बायपास रस्ता असेल किंवा नगरपरिषद च्या पाणीपुरवठा पाणी टाकीजवळील रस्ता असेल. किंवा मंगलधाम परिसरातील रस्ता असेल या सर्व रस्त्यांनी पहिला पाऊस सुद्धा नीट पाहिला नाही. ऐन आचारसंहितेच्या काळात सदर रस्त्यांना डागडूजी करण्यात येत असल्याची माहिती मिळाली आहे. चार पैशाच्या कमिशन खोरीमुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी स्वीकारलेली लाचारी ही दुःखद असल्याची चर्चा शहरातील नागरिक करत असतात. अशा निकृष्ट दर्जाच्या रस्ते कामांची शृंखलाच या शहरात आहे एवढेच नव्हे तर सध्या सुरू असलेल्या रस्ते कामांमध्येही प्रचंड मोठ्या प्रमाणात हेराफेरी पाहायला मिळते. प्रत्यक्ष काम आणि अंदाजपत्रकातील काम यामध्ये प्रचंड तफावत असली तरी.

काम झाल्यावर मोजमाप पुस्तिका ची नोंद करत असताना काम जणू काही अंदाजपत्रकाप्रमाणेच झाले आहे असे भासवण्याचा प्रयत्न केला जातो. जन्म मृत्यूचे दाखले सारख्या साध्या साध्या कामासाठी नागरिकांना नगरपालिकेच्या अनेक फेऱ्या घालाव्या लागतात परंतु ठेकेदारांच्या कामासाठी मात्र नगरपालिका रात्री आठ वाजता पर्यंत ही सुरू असते. इतक्या मोठ्या प्रमाणात निधीचा खर्च होऊन सुध्दा शहराच्या चेहऱ्यामुळे कुठलाही ठोस बदल पाहायला मिळत नाही. अभियंतांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये एखादी सुरक्षा भिंत खराब झाली म्हणून दुसरी सुरक्षा भिंत बनवावी असे नमूद केल्या जाते व असे असताना खराब झालेल्या सुरक्षा भिंतीवर नवीन सुरक्षा भिंत बांधण्याची मजल मारलेली दिसते. साधारणतः दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊ न सुद्धा राज्यांमध्ये अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नाही त्यातीलच एक म्हणजे मंगरूळपीर नगर परिषद. कोणाचाही धाक नसलेल्या या भ्रष्ट यंत्रणेकडून नेहमीच मनमानी कारभार होत असतो. नागरिकांच्या तक्रारींना केवळ केराची टोपली दाखवणारी नगरपरिषद मात्र ठेकेदारांच्या कामासाठी अतिशय शिस्तबद्धता दाखवत असते. थातूरमातूर अंदाजपत्रक म्हणून अडीच लाख रुपयापेक्षा जास्त किमतीचे काम सुरू करून घेण्याचे धाडस नगरपरिषद मंगरूळपीरच करू शकते. प्रशासकीय राजवटीमध्ये सुद्धा येथील भ्रष्ट व्यवस्थेचे चित्र बदललेले पाहायला मिळाले नाही. उलट प्रश्नच विचारायला कोणी नसल्याने स्वैरवृत्तिने काही ठेकेदारांना हाताशी घेऊन या नगर परिषदेतील काही कर्मचारी व अधिकारी मनमानी पद्धतीने शासनाच्या निधीचा दुरुपयोग करताना दिसत आहे.

# डुबेरे येथील जनता विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन




सिन्नरः डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक रामदास वाजे होते.व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक डी. एच.जाधव, सोमनाथ गिरी,सोमनाथ पगार,राजेंद्र गांगुर्डे , कचेश्र्वर शिंदे उपस्थित होते. उपस्थितींच्या हस्ते डॉ .आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या जीवन व कार्याविषयी उपशिक्षिका रेखा खंडीझोड ,प्राध्यापिका वृषाली घुमरे यांनी करून दिला. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक रामदास वाजे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. पर्यवेक्षक वाजे म्हणाले की,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कायदेतज्ञ,घटनाकार,अर्थशास्त्रज्ञ,तत्त्वज्ञ आणि समाज सुधारक,पत्रकार होते. कायदामंत्री असतांना त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे.त्यांनी दलित, महिला व कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. त्यांनी अनेक पुस्तके, ग्रंथ लिहिली.

सूत्रसंचालन सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी तर आभार दिंगबर जाधव यांनी मानले. यावेळी डोंगरसिंग रबडे, सीमा गोसावी,शिवाजी गुरुळे ,टी. के.बहिरम,सुषमा थोरात,सुनिल ससाणे,रेवण कांगणे,रामदास वारुंगसे,सुदाम वारुंगसे,संदीप पानसरे,सोमनाथ माळी, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रवि गोजरे,ज्ञानेश्र्वर कडभाने, आदींसह शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सातन दुधनी येथील शेतकऱ्याचे शेडनेट उडाले; लाखोचे नुकसान मदतीची मागणी



अक्कलकोट/प्रतिनिधीःसातन दुधनी(ता.अक्कलकोट) येथे शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास अचानक सोसाट्याच्या वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील शेडनेट उडाल्याने लाखोचे नुकसान झाले आहे.स्थानिक महसूल प्रशासनाकडून त्वरित पंचनामे करून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावे.

संदीप शिवाजी राठोड यांनी काही वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्च करून शेतात शेडनेट उभारले होते. दुष्काळी परिस्थितीत देखील भाजीपाल्याचे पीक चांगल्यापैकी जोपासले.परंतु शनिवारी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे शेडनेट फाटल्याने मोठे नुकसान झाले आहे.

# नळदुर्ग येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



नळदुर्ग/प्रतिनिधीः समता , स्वतंत्र बंधुता आणि न्याय समानता आणि अखंडता सांगणारे विश्र्ववंदनीय भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने नळदुर्ग मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची भव्य मिरवणूक काढून भीमनगर येथे प्रतिष्ठापना करण्यात आलीभारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी त्रिशरण पंचशील दिले त्याचबरोबर डॉ आंबेडकर नगर , इंदिरानगर , बुद्ध नगर , प्रतिमेचं पुजन करण्यात आले अनेक ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच पुजन करण्यात आले यावेळी अमरदीप लेझीम संघाच्या खेळाडूंनी आपली कला सादर केली याचबरोबर भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दलाचे सैनिक राजरत्न बनसोडे , योगेश सुरवसे यांनी निळ्या ध्वजाला मानवंदना दिली नळदुर्ग येथील नेते अशोक भाऊ जगदाळे यांनी ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमच पुजन केले नळदुर्ग शहरात नविन पुतळा घेऊन आल्याने या पुतळयाची मिरवणूक काढण्यात आली ही मिरवणूक डॉल्बी सिस्टीम लेझीम पथका सह काढण्यात आली . हि मिरवणूक डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौक अक्कलकोट रोड , बुद्धनगर डॉ आंबेडकर नगर , मार्गे भिमनगर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहात ठेवण्यात आली यावेळी अनेक शहरातील सर्व नागरीक उपस्थित होते . निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण नायब सुभेदार डिंगबर बनसोडे यांनी केले या मिरवणूकीत महिलानी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना रिपाइच्या वतीने अभिवादन



सोलापूर/प्रतिनिधीः विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती संपूर्ण जगा मध्ये मोठया आनंदाने आणी उत्साहने साजरी होत असून सोलापूर सारख्या चळवळीच्या ठिकाणी सुद्धा मोठ्या उत्साहाने साजरी होत असते त्याच धरतीवार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व अल्पसंख्यांक विभाग सोलापूरच्या वतीने पक्ष्याच्या संपर्क कार्यालय येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सहामुहिक बुद्ध वंदना घेण्यात आली त्या नंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील पूर्णकृती पुतळ्यास पक्ष्याचे प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे यांच्या हस्ते पुष्प हारअर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले या वेळी रि पा इ चे माणिक आठवले जाक्कापा कांबळे रावसाहेब साहेब परीक्षाळे मारुती सोनवले मेजर साबळे धर्मा माने सागराज बिराजदार फैजलं सालर सोहेल इयागीरदार सलीम मुल्ला शिकदर शेख इम्रान शेख इब्राहिम शेख समिर मुजावर नागेश कांबळे कल्लापा बनसोडे सचिन साबळे पूनम मोरे अमिना शेख कविता ससाणे राजश्री साबळे आदि प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# सविधान राहिली नाही तर लोकशाही राहणार नाहीः आ.प्रणिती शिंदे



सोलापूर/प्रतिनिधी : काही विचारसरणीचे लोक आणि पक्ष आज संविधान बदलण्याची भाष्य करीत आहेत मात्र संविधानाचा नाही राहिले तर लोकशाही राहणार नाही त्यामुळे आज डॉ. बाबासाहेब खरंच अभिवादन करायचं असेल तर आपल्याला देशात संविधान बदलण्याची जी षडयंत्र चालू आहे त्याच्या विरोधात सगळ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे कोणतेही भेदभाव जात धर्म जमात न पाहता सगळ्यांनी एकत्र येऊन शत्रूच्या विरोधात उभे राहण्याची गरज असल्याचे मत आमदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केले आहे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रयास महारवर्गभोवतीचे संस्था सोलापूर च्या वतीने सोलापूर शहरातील बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे संविधान बचाव अभियानांतर्गत संविधानाच्या उद्देशिके चे सामुदायिक वाचन करण्यात आले यावेळी सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार परिधी शिंदे यांनी उपस्थित लावत संविधानाच्या उद्देशिके च्या सामुदायिक वाचनालय वाचनामध्ये सहभाग नोंदवला

यावेळी पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर तो संघर्ष करीत होती तो हाच खरा संघर्ष असावा हीच खरी चळवळ असून हीच आपल्या परीक्षेची वेळ आहे कारण बाबासाहेबांनी दिलेली संविधान बदलण्याची कोणी भाष्य करत असेल तर त्याच्या विरोधात सगळ्यांनी उभे राहणे एकत्र देणे गरजेचे आहे असे आमदार पणती शिंदे यांनी यावेळी सांगितले. संविधान बदलण्याची भाषा सत्ताधाऱ्याकडून करण्यात येत असेल तर त्यांचा आपण सर्वांनी निषेध करायचा हवा ही जी चळवळ आहे हा संघर्ष आहे तो आता सुरू होण्याची वेळ आहे ठिकठिकाणी संविधानाचे वाचन घेणे गरजेचे आहे त्याचबरोबर शपथ घ्यायला पाहिजे किंवा आम्ही संविधान बदलू देणार नाही उद्या संविधानाचा नाही राहिली तर लोकशाही राहणार नाही आणि लोकशाही राहिली नाही तर हा देश विकृत मानसिकतेच्या लोकांच्या हातात जाईल आणि देशा देशच राहणार नाही त्यामुळे ही खरी परीक्षा आहे असे मत प्रणिती शिंदे यांनी एवढी आमदार प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे सचिन शिंदे प्रमिला धोंडे गणेश डोंगरे बाबा करंगळे सुशीला बोटे मधुकर आठवले नागनाथ कदम भोजराज पवार नरसिंह असू दे अनिल मस्के बसवराज मित्रे सुशील बंद पट्टे राजन कामत श्रीकांत श्री नागेश मेत्रे लखन गायकवाड तिरुपती परके पंडाला परशुराम सतारे वाले अंबादास गुत्ती कोंडा सुहास जाधव बालाजी जाधव अनुपम शहा सुभाष वाघमारे नागनाथ शहाणी उमेश सुस्ते संजय गायकवाड आणि काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि भीमसैनिक मोठ्या संख्येने



स्वः सावरकर सार्वजनिक वाचनालय वागदरी श्री मलप्पा निरोळी सुधिर सोनकवडे परमेश्र्वर फुलमाळी राजकुमार दणुरे परमेश्र्वर पाटिल श्रीकांत सोनकवडे महेश बंडगर दिलीप कटकधोंड सुरेष छुरे

# सिन्नुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३३ व्या जयंती उत्साहात साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुकामधील सिन्नुर गावात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३३ व्या जयंती साजरा करण्यात आला.प्रथमता तथागत गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रतिमापुजन मान्यवराचा हस्ते करण्यात आला.त्यानंतर ध्वजारोहन करण्यात आले.व उपस्थित जनसमुदायसा पेढा खाऊ वाटप करण्यात आले.प्रमुख उपस्थिती म्हणुन सरपंच कल्पना सोनकांबळे, ग्रामसेवक एस.एस.वळसंगकर, पोलिस पाटिल आर.आर.पठाण, ग्रामपंचायत लिपिक शिवपूत्र जेवर्गी, शिराज पठाण, रेशनीग दुकानचे संगमेश कण्णी उपास्थित होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत क्रमचारी, सोसायटी सदस्य, गावातील आजी माजी सदस्य व गावातील सर्व समाजाचे नेतेगण उपास्थित होते.जयभिम तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.जयकुमार सोनकांबळे यांनी कार्याक्रमाचे प्रास्ताविक व आभार मांडळे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवानंद सोनकांबळे,लक्ष्मीपुत्र कांबळे,सुनिल सोनकांबळे,प्रशांत सोनकांबळे,राहुल सोनकांबळे,हणमंत सोनकांबळे, बाळप्पा कांबळे,कंटेप्पा कांबळे,कल्याणी सोनकांबळे,शाणप्पा सोनकांबळे यांचासह जयभिम तरुण मंडळाचे कार्यकर्ते परिश्रम घेतले.

# सीताराम सावंत हा भूमी आणि भूमिकेशी प्रामाणिक असणारा लेखक : श्रीकांत देशमुख





पंढरपूर/प्रतिनिधीः सभोवतालची परिस्थिती लेखकाने स्वत:च्या अंत:करणात मुरविल्याशिवाय तिचे प्रतिबिंब साहित्यात येवू शकत नाही. लेखक हा आपल्या भोवतालाशी प्रामाणिक असला पाहिजे. लेखकाचे साहित्य हे दर्जेदार निर्माण होण्यासाठी लेखक डोळस असावा लागतो. सध्याच्या परिस्थितीत खेडी बदलत आहेत. शहरे जवळच्या खेड्यांना गिळंकृत करायला लागली आहेत. आधुनिकीकरणाने लोकांची जीवनशैली बदलली आहे. या बदलामुळे लोकांच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या असून या समस्या साहित्याचा विषय बनल्या पाहिजेत. सीताराम सावंत यांचे लेखन भोवतालच्या समस्यांचे चित्रण करणाऱ्या आहेत. म्हणून सीताराम सावंत हे भूमी आणि भूमिकेशी प्रामाणिक असणारे लेखक आहेत. असे प्रतिपादन ज्येष्ठ मराठी साहित्यिक श्रीकांत देशमुख यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रुसा काम्पोनंट ८ अंर्तगत मराठी विभाग व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सीताराम सावंत: व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावरील परिसंवादाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते. यावेळी मंचावर समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, टेंभूर्णी येथील लेखक प्राचार्य डॉ. महेंद्र कदम, माणदेशी साहित्यकार आनंद विंगकर, उपप्राचार्य डॉ. बजरंग शितोळे, डॉ. भगवान नाईकनवरे, प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. अनिल चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

श्रीकांत देशमुख पुढे म्हणाले की, सीताराम सावंत यांच्या साहित्यात माणदेश प्रदेश आलेला आहे. माणदेशातील माणसांच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्याचा श्र्वास बनले आहे. माणदेश हा नैसर्गिकदृष्ट्या प्रतिकूल प्रदेश असून इथल्या माणसांचा जगण्याचा संघर्ष रोजचाच असतो. सावंत यांनी लेखनात शैलीचे आणि अभिव्यक्तीचे प्रयोग केले आहेत. त्यामुळे त्यांच्या साहित्यातील पात्रे जिवंत वाटतात.

या परिसंवादात भूमिका मांडताना आनंद विंगकर म्हणाले की, सध्या आधुनिकीकरणाने लोकांचे जगणे सुसह्य केले आहे. या सुसह्यतेसोबत आलेला चंगळवाद जोपासण्यासाठी आवश्यक असणारा पैसा मिळविण्याचे लोकांनी विविध मार्ग निवडले आहेत. हे मार्ग निवडत असताना पूर्वीच्या नैतिकतेच धाक राहिला नाही. त्यामुळे समाजात विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. सुधारणा होत आहेत, मात्र माणूस सुखी होईल का हे तपासायला हवे. बदलणाऱ्या समाजव्यवस्थेचे चित्रण लेखकांनी आपल्या साहित्यात केले पाहिजे. देशोधडी आणि भुई भुई ठाव दे या कादंबऱ्यातून अशा बदलत्या संस्कृतीचे चित्रण आलेले आहे.

प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनी सीताराम सावंत यांच्या कादंबरी लेखनाविषयी भूमिका मांडताना जागतिकीकरणाच्या परिणामातून निर्माण झालेल्या समस्या आणि त्याचे सामान्य जन जीवनावर होत असलेले परिणाम विस्ताराने मांडले. 'सीताराम सावंत यांचे साहित्य हे शेती, शेतमजुरी आणि बाजारीकरण यांचे चित्रण मांडते. गावातला सामान्य माणूस त्याचे बेरोजगारीपण आणि त्यातून निर्माण झालेला संघर्ष हा देशोधडी चा विषय आहे. गावातील दलित समाजातील स्त्री गावच्या सरपंचपदी विराजमान होते. ही बाब प्रस्थापित समाजाला आव्हान ठरणारी आहे. याचे चित्रण सावंत यांच्या साहित्यात येते.'

प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिसंवादात सावंत यांच्या कथाविश्र्वाविषयी भूमिका मांडली. त्यामध्ये 'हरवलेल्या कथेच्या शोधात' आणि 'वस्तरा चालविणारी बाई' यासारख्या कथा समाजातील वेगळेपण चित्रित करणाऱ्या आहेत. सीताराम सावंत हे भोवतालाकडे निरागसतेने पाहतात आणि ही निरागसता त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित होते. सावंत यांनी त्यांच्या कथांमध्ये रहस्य कथांचा रूपबंध वापरला आहे. 'वामन मोरेचे काय झाले ?' ही अशाच वळणाची एक कथा वाचकाला शेवट पर्यंत गुंतवून ठेवते. हे सावंत यांच्या लेखनाचे यश आहे.'

या परिसंवादाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले की, सीताराम सावंत हे रयत सेवक असून ते या शाखेवर कार्यरत आहेत. त्यांच्या साहित्याची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात होत असते. त्यांना आजवर विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून त्याची दखल रयत शिक्षण संस्थेने घेतली आहे. सावंत यांच्या लेखनाविषयी चर्चा महाविद्यालयात घडवून आणणे ही आमची भूमिका होती. सावंत यांनी केलेले लेखन हे मराठी साहित्यातील मैलाचा दगड ठरेल असा विश्र्वास या परिसंवादातील वक्तृयांनी व्यक्त केला ही रयत परिवारासाठी आनंददायक बाब आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत आणि मान्यवरांचा परिचय मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी करून दिला. या परिसंवादास सांगोला येथील प्राचार्य डॉ. कृष्णा इंगोले, मोडनिंब येथील डॉ. वामन जाधव, कल्याण शिंदे, शहाजीराजे बळवंत, प्रकाशक बाळासाहेब धोंगडे आदी साहित्यिक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास सोलापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, अभ्यासक बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात 'देशोधडी' या कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यालयीन प्रमुख प्रभाकर पारधी, प्रा. हरिभजन कांबळे, प्रा. सारिका भांगे, डॉ. सुमित साळुंखे, प्रा. राजेंद्र मोरे, अभिजित जाधव, सुरेश मोहिते, अमोल माने, नागनाथ खंदारे आदींनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हेमंत गव्हाणे यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी मानले.

# हन्नुर येथे विविध ठिकाणी भीम जयंती उत्साहात साजरी





अक्कलकोट/गौतम बाळशंकरः लुंबिनी बुद्धविहार येथे संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून महामानवा डॉ बाबासाहेब आंबेडकर अभिवादन करण्यात आले.

प्रतिमा पूजन ग्रामपंचायत कर्मचारी लक्ष्मण बालशंकर व मनीषा बाळशंकर यांच्या हस्ते करण्यात आले सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. ग्रामपंचायत सदस्य पत्रकार गौतम बाळ शंकर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रकट केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्या. नीता सोनकांबळे, जयंती मंडळ अध्यक्ष कोंडीबा सोनकांबळे, माजी सरपंच निलेश बाळशंकर, परसराम बाळशंकर, नागनाथ बालशंकर, भिवा बाळ शंकर, उमेश बाळशंकर, सुभाष दुपारगुडे, बाबू तूपसाखरे, मला बाळशंकर, काशिनाथ सोनकांबळे संतोष बालशंकर, उत्तम बाळशंकर, अंगणवाडी सेविका ज्योती बाळशंकर, वैशाली बाळशंकर, रूपाली बाळशंकर, रत्नाबाई बाळशंकर, विजया बाळशंकर, मनीषा बाळशंकर सतीश बाळ शंकर, आधी भीमसैनिक बुद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हन्नुर ग्रामपंचायत च्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.सर्व प्रथम प्रतिमा पूजन सरपंच सोनाली तलवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य पत्रकार गौतम बाळ शंकर यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आपल्या भाषणातून व्यक्त केले. म्हणाले की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरां मुळे तळागळातल्या मानवाला न्याय मिळाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी. उपसरपंच सागर दादा कल्याण शेट्टी होते.

यावेळी ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत थोरात, माजी सरपंच निलेश बाळशंकर, ग्रामपंचायत सदस्य कोडीबा सोनकाबळे, अंगणवाडी सेविका ज्योती बाळशंकर नया बाळशंकर, बाबू तूपसाखरे माला बाळशंकर, ग्रामपंचायत कर्मचारी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित गावकऱ्यांचे आभार ग्रामपंचायत सदस्य पत्रकार गौतम बाळशंकर यांनी केले. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा हन्नुर येथे महामानवास अभिवादन करण्यात आले. प्रतिमापूजन पत्रकार गौतम बाळशंकर यांच्या हस्ते करण्यात आले, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्रीकांत राठोड सर उपस्थित होते, यावेळी ग्रामपंचायत सदस्य कोंडीबा सोनकांबळे, विजय गायगवळी सर, फिरदोस सय्यद मॅडम, संध्याराणी ओमन मॅडम, मुलानी सर आधी उपस्थित होते या यावेळी विद्यार्थ्यांचे भाषण झाले. कार्यक्रमाच्या सांगता वेळेस विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून आभार मानण्यात आले.

# अक्कलकोट भीमनगर येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी कडून महामानवास अभिवादन



अक्कलकोट/प्रतिनिधीः भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव, युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अक्कलकोट येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अक्कलकोटचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी विनम्र अभिवादन केले. यावेळी श्री. अविनाश मडीखांबे, श्री. उत्तम गायकवाड, श्री. राजेंद्र टाकने, श्री. विजय हार्डीकर, श्री. एजाज मुल्ला, श्री. मोहन चव्हाण, श्री. राम जाधव, श्री. अप्पू पराणे, श्री. नन्नूभाई कोरबु, श्री. नागराज कुंभार, श्री. शिलामणी बनसोडे, श्री. मारुती बावडे, श्री चंद्रशेखर मडीखांबे, श्री. स्वामीराव गायकवाड, श्री. राजू जगताप, श्री. रशिद क्रिस्तके, श्री. बागल साहेब, श्री. शुभम मडीखांबे, श्री. तुषार गायकवाड, श्री. आकाश मडीखांबे, श्री. दत्ता शिंदे, श्री. नितेश मडीखांबे, श्री. श्याम घाटगे, श्री. रोहित वाघमारे, श्री. भीम मडीखांबे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहापूर मधील भीमकन्या सर्वोच्च न्यायलयात सादर करणार इच्छा मरणाचा दावा




शहापूर/विजय घनघाव : घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा शहापूर शहरात उभारण्यात यावा या मागणीसाठी गेल्या ६७ दिवसापासून घर छोडो आंदोलन करणाऱ्या रमाबाई ब्रिगेड महिला संघटनेच्या ज्योती गायकवाड आणि त्यांचे पती सत्यकाम पवार आता त्यांचं आंदोलन आणखीन तीव्र करणार आहेत. रखरखत्या उन्हात तब्बल ४०-४१. डिग्री तापमान असताना ज्योती गायकवाड या शहापूर तहसीलदार कार्यलय समोर आंदोलन करीत आहेत.. पण शासनाला डॉ. आंबेडकर यांच्या पुतळा उभारावा...या आपल्या मागणीची बिलकुल काही पडलेली नाही.. शहापूर तहसीलदार पुतळा उभारणी साठी जागा देऊ असं तोंडी आश्र्वासन देत आहेत पण लेखी आश्र्वासन द्यायला तयार नाहीत..एकीकडे शासन आपल्या दारीं असा कार्यक्रम करणारे राज्यकर्ते... तर आपण आज शासनाच्या दारात गेल्या ६७ दिवसापासून आहोत.. आणि आता आपण १४एप्रिल पासून आमरण उपोषण करणार आहोत आणि इच्छा मरणाचा दावा सर्वोच्च न्यायलयात सादर करणार आहोत..आपल्या जीवाचं काही बरं वाईट झालं तर त्याला शासन आणि इथले अधिकारी जबाबदार असतील अशी माहिती ज्योती गायकवाड यांनी दिली आहे...

शहापूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणी मागणी पूर्ण झाल्या शिवाय आपण आता मागे हटणार नाही असं ज्योती गायकवाड यांनी नमूद केलं आहे..

# सांगोला मंगळवेढा पोलिसांनी फिल्मी स्टाईल पाठलाग करून करून अवैधरित्या दारू घेऊन जाणारा जीप चालकास पकडले

पंढरपूर/प्रतिनिधी:सांगोला मंगळवेढा सांगोला पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पाठलाग करून अवैधरित्या विदेशी दारू घेऊन सुसाट वेगाने जाणाऱ्या जीप चालकास पाटला करून सांगोला शहरातील

धनगर गल्लीत शनिवारी सायंकाळी सातच्या सुमारास पकडले सांगोल्या त वरदळीच्या रस्त्यावर पोलिसात आणि जीभ चालकांमधील अर्धा तास चाललेला ठराव पाहून नागरिक घाबरले होते हा गुन्हा मंगळवेढा पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडल्याने जीप चालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवेढा पोलीस स्टेशनच्या रात्री उशिरापर्यंत सुरू होती सांगोला मंगळवेढा रोड शनिवारी सायंकाळी सहाच्या सुमारास एम एच ४५ एम एल ८४१७ ची बोलेरो जीप आंधळगाव चेक पोस्ट जवळ तपासण्यासाठी थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने सुसाट गाडी पळवली त्यावेळेस सांगोला पोलीस निरीक्षक भीमराव खंडागळे यांनी ही माहिती मिळाली तेही पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्या समितीच्या पाठलाग करताना ही जीभ शहरातील धनगर गल्ली येथे सायंकाळी सातच्या सुमारास पकडून चालकास ताब्यात घेतली यावेळी ठिकाणी बघायची मोठी गर्दी




झालेली नेमके काय घडले याची नागरिकांना चर्चा करीत होती पोलिसांनी चार काकडे चौकशी केली असता जीपमध्ये अवैधरित्या विदेशी दारू असल्याचे समोर आले आहे

# पत्रकार मुन्नाभाई नदाफ यांच्या घरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

दत्तवाड/प्रतिनिधीः आधुनिक भारताचे निर्माते स्वतंत्र, भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती दत्तवाड येथील पत्रकार मुन्नाभाई नदाफ यांच्या घरी साजरी करण्यात आली. कुरुंदवाड पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक रविराज फडणीस, सरपंच चंद्रकांत कांबळे, उपसरपंच अकबर काले, ड. युवराज घोरपडे, राजगोंडा पाटील, ड. सुरेश पाटील यांच्या हस्ते मूर्तीस पुष्पहार अर्पण करून महामानवास अभिवादन करण्यात आले.१४ एप्रिल हा दिवस सर्वत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणून साजरी केली जाते. दत्तवाड ग्रामपंचायत, बौद्ध विहार आदी ठिकाणी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी पोलीस पाटील संजय पाटील, ग्रा.पं. सदस्य रफिक मुल्ला, धन्यकुमार सिदनाळे, विवेक चौगुले, सुरेश पाटील, राजेंद्र पाटील, दिलीप शिरढोणे (सर), मोहन माळगे, तेजस वराळे, कुमार पाटील,



विद्याधर कांबळे, नूरमंहमद नदाफ, नितीन कांबळे, रवींद्र कांबळे, मिलिंद देशपांडे, जहांगीर रनमल्ली, सुभाष कांबळे, जितेंद्र दावणे, सागर कोळी त्याचबरोबर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.